( इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर )

[२०२३] २ एस.सी.आर. १११२

श्रीमती क्ष

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि दुसरा

**( फौजदारी अपील क्रमांक ८२२-८२३ / २०२३ )**

मार्च १७, २०२३

[ ए. एस. बोपण्णा आणि हिमा कोहली, न्या. न्या. ]

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ - कलम ४३७, ४३८ आणि ४३९ –दंड संहिता,१८६० - कलम ३५४, ३५४ - ब, ३७६, आणि ५०६ - अटकपूर्व जामीन - रद्द करणे - अपीलकर्त्या स्त्री फिर्यादीने तिला मॉडेलिंगचे काही काम देण्याच्या बहाण्याने ज्या हॉटेलच्या खोलीत ती राहत होती तेथे तिच्यावर बलात्कार केला म्हणून उत्तरवादी क्रमांक 2-आरोपीविरुद्ध दाखल केलेली तक्रार - सुरुवातीला एफ आय आर ( प्रथम खबर अहवाल ) भा दं वि, कलम ३५४, ३५४-ब आणि ५०६ अन्वये नोंद झाला आणि नंतर अपीलकर्त्या स्त्री चा पुरवणी जबाब नोंदविला गेला आणि एफ आय आर मध्ये कलम ३७६ जोडण्यात आले - उच्च न्यायालयाने अपीलकर्त्या स्त्री ने तिच्या निवेदनात सुधारणा केली म्हणून अटकपूर्व जामीन उत्तरवादी क्रमांक २ ला मंजूर केला – अपीलावर खालील प्रमाणे निर्णय दिला : कथित गुन्हा आणि त्याचे स्वरूप व गांभीर्य,

अपीलकर्त्याच्या तुलनेत आरोपीची आर्थिक उंची, पद परंतु याबाबत अपीलकर्त्याच्या भूमिकेकडे उच्च न्यायालयाने दुर्लक्ष केले. - प्रथमदर्शनी आय पी सी च्या कलम ३७६ च्या तरतुदीला आकर्षित करणारी एफ. आय. आर. (प्रथम खबरी अहवाल ) मध्ये पुरेशी सामग्री होती – अपीलकर्ती ने हस्तक्षेपासाठी अर्ज दाखल केला असला तरी उत्तरवादी क्रमांक २ ने दाखल केलेल्या अटकपूर्व जामिनाच्या याचिकेत उच्च न्यायालयासमोर तिला सुनावणी देण्यात आली नाही - स्वत: अपीलकर्त्याशिवाय दुसरा कोणताही साक्षीदार नाही, उच्च न्यायालयाने सुनावणीची संधी द्यायला हवी होती - मंजूर केलेला अटकपूर्व जामीन टिकण्याजोगा नाही - उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करण्यात आला.

अपिलांचा निपटारा करताना न्यायालयाने असे मत मांडले **:**

१. कथित गुन्ह्याचे स्वरूप व गांभीर्य दुर्लक्षित करण्यात आले आहे. तसेच आरोपीची आर्थिक उंची, स्थिती या तुलनेत अपीलकर्ता/फिर्यादी यांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करण्यात आले. उच्च न्यायालयाने उत्तरवादी क्रमांक २/आरोपीच्या बाजूने तीन वर्षांच्या संक्षिप्त आदेशाद्वारे अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे 'फिर्यादीच्या कथनातील स्टार व्हेरिएशन्स'मुळे प्रभावित झालेल्या परिच्छेदांमध्ये मुळात एफ. आय. आर. (प्रथम खबरी अहवाल ) मध्ये जे नोंदवले गेले होते, ते आय. पी. सी च्या कलम ३७५ मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे बलात्काराचा गुन्हा ठरत नाही, जे चुकीचे गृहीतक आहे. जरी 6 ऑगस्ट, २०२२ रोजी सायंकाळच्या वेळेत पहिला पुरवणी जबाब नोंदवला असला तरी उत्तरवादी क्रमांक 2 / आरोपीविरूद्ध एफ. आय. आर. ( प्रथम खबरी

अहवाल ) दाखल केल्याच्या तारखेची नोंद अपीलकर्ता / फिर्यादीने त्याच दिवसाच्या पूर्वार्धात केली, 6 सप्टेंबर, २०२२ रोजी नोंदवलेला तिचा दुसरा पुरवणी जबाब आणि 8 ऑगस्ट, २०२२ रोजी अपीलकर्ता / फिर्यादीची तपासणी करणाऱ्या डॉक्टरांचा मेडिको-लीगल अहवाल एका क्षणासाठी बाजूला ठेवला तरी , या न्यायालयाला असे आढळते की एफ. आय. आर. (प्रथम खबरी अहवाल ) मधील सामग्री जी प्रथमदर्शनी आय. पी. सी च्या कलम 376 च्या तरतुदीस आकर्षित करण्यास पुरेसे आहे. या न्यायालयाच्या मते, या घटकांनी उच्च न्यायालयाला उत्तरवादी क्रमांक २/आरोपीच्या बाजूने स्वेच्छाधिकराचा वापर करण्यापासून परावृत्त करायला हवे होते

अटकपूर्व जामीन . [परिच्छेद २२] [११३१ - ई - जी; ११३२ - ए - बी]

२. या आदेशात हस्तक्षेप करण्याचे आणि दुसरा कारण या न्यायालयाला वाटते आहे ते म्हणजे प्रतिवादी क्रमांक २/ आरोपीने उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेल्या याचिकेवर अपीलकर्त्याने / फिर्यादीने हस्तक्षेपासाठी अर्ज दाखल केला असला तरी तिला सुनावणी ची संधी दिली गेली नाही. राज्य उपस्थित होते आणि उपरोक्त कार्यवाहीत त्याने प्रतिनिधित्व केले गेले होते, परंतु तिचा अधिकार केवळ याच कारणास्तव संकुचित करण्याची आवश्यकता नव्हती. अशा प्रकारच्या गुन्ह्यात जिथे सामान्यत: फिर्यादीशिवाय दुसरा साक्षीदार नसतो, अशा परिस्थितीत उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याला विशेषतः काळजीपूर्वक ऐकणे बंधनकारक राहते आणि असा दृष्टिकोन म्हणजे आरोपीने दाखल केलेल्या अटकपूर्व जामिनाच्या अर्जाला विरोध करण्याच्या अधिकारासह फौजदारी कारवाईत सहभागी होण्याचा फिर्यादीचा

अधिकार अमान्य करण्यासारखेच आहे. प्रतिवादी क्रमांक २/आरोपीच्या बाजूने मंजूर करण्यात आलेल्या अटकपूर्व जामिनाच्या पहिल्या आदेशाला दुसऱ्या आदेशाने दुजोरा मिळाला तेव्हा अर्थपूर्ण सुनावणी नाकारणे हा एक अतिरिक्त घटक आहे ज्यामुळे या न्यायालयालयास संबंधित आदेशात हस्तक्षेप करण्यास भाग पाडले आहे. [परी. २३, २५] [११३२-बी-डी; ११३३-एफ-जी]

सुशीला अग्रवाल व इतर वि. राज्य (एन सी टी ऑफ दिल्ली) आणि दुसरा (2020) 5 एस सी सी 1 : [2020] 2 एससीआर 1 – येथे अनुसरून.

प्रसंत कुमार सरकार विरुद्ध आशिष चॅटर्जी आणि आणि दुसरा (२०१०) १४ एस सी सी ४९६ : [२०१०] १२ एससीआर ११६५; मन्सूर वि.उत्तर प्रदेश राज्य आणि आणि दुसरा (२००९) १४ एस सी सी २८६ : [२००९]६ एससीआर १०३०; कल्याण चंद्र सरकार वि. राजेश रंजन उर्फ पप्पू यादव आणि दुसरा (२००४) 7 एस सी सी ५२८; मायकला धर्मराजम व इतर वि. तेलंगणा राज्य आणि दुसरा (२०२०) २ एस सी सी ७४३; प्रदीप राम वि. झारखंड राज्य आणि इतर (२०१९) १७ एस सी सी ३२६ : [२०१९] 8 एससीआर ८२४ - यावर भिस्त ठेवली.

उत्तर प्रदेश राज्य सीबीआय मार्फत विरुद्ध अमरमणि त्रिपाठी (२००५)

8 एस सी सी 21 : [२००५] 3 एससीआर 454; प्रल्हाद सिंह भट विरुद्ध एन सी टी, दिल्ली आणि दुसरा (२००१) ४ एस सी सी २८० : [2001] 2 एससीआर 684; राम गोविंद उपाध्याय वि.

सुदर्शन सिंग आणि इतर (२००९) १४ एस सी सी  २८६ : [2009] 6 एससीआर 1030; महाराष्ट्र राज्य वि. रितेश (२००१) ४ एस सी सी  २२४ : [२००१] २ एससीआर ४३८; पंचानन मिश्रा विरुद्ध दिगंबर मिश्रा आणि इतर (२००५) ३ एस सी सी १४३ : [२००५] 1 एससीआर 484; विजय कुमार वि. नरेंद्र आणि इतर २००२) 9 एस सी सी  ३६४; अन्वरी बेगम विरुद्ध शेर मोहम्मद आणि दुसरा (२००५) ७ एस सी सी  ३२६ : [२००५] ३ एससीआर २८७; नीरू यादव वि. उत्तर प्रदेश राज्य आणि दुसरा (2014) 16 एस सी सी  508 : [2014] १२ एससीआर ४५३ ; अनिल कुमार यादव वि. राज्य (एन सी टी दिल्ली) आणि आणि दुसरा (2018) 12 एस सी सी १२९ : [२०१७] ११एससीआर 195; महिपाल वि राजेश कुमार ऊर्फ पोलिया आणि दुसरा (२०२०) २ एस सी सी

118 : [२०१९] 14 एससीआर 529; सुप्रीम भिवंडी वाडा मनोर इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड वि. महाराष्ट्र राज्य  आणि दुसरा (2021) ८ एस सी सी  ७५३; जगजीत सिंग व इतर विरुद्ध आशिष मिश्रा ऊर्फ मोनू आणि दुसरा (२०२२) ९ एस सी सी  ३२११ - संदर्भित.

[२०१०] १२ एससीआर ११६५ पॅरा ८ यावर भिस्त ठेवली होती

[२००९] ६ एससीआर १०३० पॅरा १३ यावर भिस्त ठेवली होती

[२००५] ३ एससीआर ४५४ येथे संदर्भ परी. १२

[२००१] २ एससीआर ६८४ येथे संदर्भ परी. १२

[२००९]६  एससीआर १०३० येथे संदर्भ परी.  १२

[२००१] २ एससीआर ४३८ येथे संदर्भ परी.  १२

[२००५] १ एससीआर 484 येथे संदर्भ परी.  १३

[२००५] ३ एससीआर २८७ मध्ये परिच्छेद १३ चा उल्लेख आहे

[2014] १२ एससीआर 453 येथे संदर्भ परी.  १३

[२०१७] ११ एससीआर १९५ येथे संदर्भ परी.  १३

[२०१९] १४ एससीआर ५२९ पॅरा १३ चा संदर्भ

[2020] २ एससीआर 1 नंतर पॅरा १५

[२०१९] ८ एससीआर ८२४ पॅरा १९ यावर भिस्त ठेवली होती

फौजदारी अपील अधिकारक्षेत्र: फौजदारी अपील  क्रमांक ८२५२ - ८२३  / २०२३ मधील मुंबई येथील उच्च न्यायालयाचा एबीए क्रमांक २५९४ / २०२२ मधील दिनांक २१/९/२०२२ आणि ७/१०/२२ च्या निर्णय व आदेशावरून

आर. बसंत, वरिष्ठ वकील  , सुबोध के. आर. पाठक, अभिजीत चॅटर्जी, शहसी रंजन, पवन कुमार शर्मा, गौतम बरुआ, आकाश स्वामी, रवी पी. वाधवानी, .....  अपीलकर्त्याचे वकील

संजय के. हेडगे, वरिष्ठ वकील  , धर्मेंद्रकुमार सिन्हा, अखिलेश  सिंग, नीतू सिंह, अरुण अधलाखा, नितीन लोणकर, सिद्धार्थ  धर्माधिकारी, आदित्य अनिरुद्ध पांडे, भरत बागला, अमित

सिंह,

लोकेश दत्त शर्मा, ....... उत्तरवादींसाठी वकील

न्यायालयाचा निर्णय यांच्याद्वारे देण्यात आला.

<u>हिमा कोहली, न्या.</u>

१. परवानगी मंजूर.

२. कुख्यात कास्टिंग काऊच सिंड्रोमच्या भयावहतेला येथे उत्तरवादी क्रमांक २/आरोपीच्या हातून सामोरे गेल्याचा दावा करणारी अपीलकर्ता/फिर्यादी मुंबई उच्च न्यायालयाने आपल्या फौजदारी अपीलीय अधिकारक्षेत्राचा वापर करून २१ सप्टेंबर २०२२[1] आणि ०७ ऑक्टोबर २०२२[2] रोजी दिलेल्या आदेशांमुळे व्यथित झाली आहे, कारण उत्तरवादी क्रमांक २/आरोपीने दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्ज[3] मंजूर केला आहे सादर जमीन हा अपीलकर्तीने एमआयडीसी पोलिस ठाणे, मुंबई येथे दिलेल्या एफ आय आर[4] ( प्रथम खबरी अहवाल ) मधील तक्रारीसंदर्भात होता. सुरुवातीला, कलम 354, 354-बी आणि 506, भारतीय दंड संहिता[5] अन्वये एफ आय आर ( प्रथम खबरी अहवाल ) दाखल करण्यात आला होता. त्यानंतर अपीलकर्ता/फिर्यादी यांचा पुरवणी जबाब नोंदवल्यानंतर एफ आय आर ( प्रथम खबरी अहवाल

1पहिला आक्षेपित आदेश
2दुसरा आक्षेपित आदेश
3अटकपूर्व जमीन अर्ज क्रमांक २५९४/२०२२
4६ ऑगस्ट २००२२ रोजी नोंदवलेला सी आर एफ आय आर क्रमांक ९१५/२०२२
5संक्षिप्त आय पी सी.

)मध्ये कलम ३७६ अन्वये गुन्हा जोडण्यात आला. पहिल्या आदेशाद्वारे उच्च न्यायालयाने काही अटींच्या अधीन राहून अंतरिम उपाय म्हणून उत्तरवादी क्रमांक २/आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर केला आणि ७ ऑक्टोबर २०२२ रोजी या आदेशावर शिक्कामोर्तब करून तो कायम करण्यात आला.

<u>या प्रकरणातील तथ्ये</u>

३. सध्याच्या अपीलांवर निर्णय घेण्यासाठी संबंधित प्रकरणातील तथ्ये थोडक्यात नमूद केली आहेत :-

३.१ अपीलकर्ता / फिर्यादी व्यवसायाने मॉडेल आहे. ५ ऑगस्ट २०२२ रोजी रात्री उशिरा तिने उत्तरवादी क्रमांक 2/आरोपीविरुद्ध एम आय डी सी पोलीस स्टेशन , मुंबई येथे तक्रार दाखल केली, जेव्हा तिने पोलिसांना फोन करण्यासाठी '100' डायल केला आणि आरोप केला की उत्तरवादी क्रमांक 2/आरोपी हा एक व्यावसायिक आहे, त्याने तिला मॉडेलिंगचे काही काम देण्याचे आमिष दाखवून तिच्यावर जबरदस्ती केली आणि ती राहत असलेल्या हॉटेलच्या खोलीत तिच्यावर बलात्कार केला.

३.२ ०६ ऑगस्ट २०२२ रोजी पहाटे एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे नोंदवलेल्या अर्जदाराच्या जबाबाचा संबंधित भाग खालीलप्रमाणे आहे :-

“ ........ त्यानंतर आम्ही आमच्या कामाबद्दल चर्चा केली, त्यानंतर जिग्नेशने मला सांगितले की

त्याला माझ्याशी काही वैयक्तिक बोलायचे आहे म्हणून त्याने मला खोलीत जाण्यास सांगितले. मग जिग्नेश मला काम देणार असल्याने रात्री सव्वा अकराच्या सुमारास मी त्याला हॉटेलच्या खोलीत घेऊन गेले . मग मी त्याला पाणी विचारले पण त्याने नकार दिला. मग तो मला म्हणाला की, "xxx तू जो फील्ड में काम करती है, वो फील्ड में तो तुम्हे पता है क्या क्या करना पडता है" (एक्सएक्सएक्स तुला माहित आहे की, तू ज्या क्षेत्रात काम करत आहेस त्या क्षेत्रात काय करायला हवं), त्यावेळी मी त्याला स्पष्ट बोलायला सांगितलं. मग तो मला म्हणाला की, "एक्सएक्सएक्स कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है" (एक्सएक्सएक्स एखाद्याला एखादी गोष्ट मिळवण्यासाठी काहीतरी त्याग करावा लागतो). त्यावेळी मी त्याला सांगितले की, मी पहिल्याच दिवशी तुला याबद्दल स्पष्टीकरण दिले आहे. त्यावेळी तो मला म्हणाला की, तुला माझ्याशी तडजोड करावी लागेल, माझे चांगले संपर्क आहेत. त्यावेळी मी त्याला स्पष्ट नकार दिला. त्यानंतर तो पलंगावरून उठला आणि मला पलंगावर ढकलले आणि त्याने माझ्या स्तनाला आणि पाठीला स्पर्श केला. मग मी आरडाओरडा करू लागले आणि मग त्याने माझी मान धरून मला जीवे मारण्याची धमकी दिली आणि मग त्याने शर्टचे बटण उघडले आणि त्याने माझे कपडे काढण्याचा प्रयत्न केला. मध्येच माझी मॅक्सी (गळ्यापासून घोट्यापर्यंत पोहोचणार स्त्रियांचा परकर ) गळ्याजवळ आणि स्तनाजवळ फाटली आणि मग त्याने त्याच्या हाताने त्याच गुप्त अंग काढल आणि तो माझ्याशी जवळीक करू लागला आणि मग मी त्याला जबरदस्तीने ढकलून रूममधून बाहेर गेले आणि मग मी जिन्यावरून रिसेप्शनवर उतरले आणि पोलिसांना १०० नंबरवर फोन

केला..............."

३.३ त्यानंतर ०६ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळीच अपीलकर्ती हिचा / फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविण्यात आला, त्यातील संबंधित भाग खालीलप्रमाणे :-

> "...... मग तो पलंगावरून उठला आणि मला जोरात ढकलून पलंगावर ढकलले. यावेळी त्याने माझ्या छातीला आणि माझ्या मागच्या बाजूला स्पर्श केला आणि मी घातलेला माझा ड्रेस उचलला. मी आरडाओरड करून माझ्यासोबत असे करू नका, अशी विनंती केली असता, त्याने माझा गळा पकडून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी माझे संपूर्ण शरीर थरथर कापत होते, मी पूर्णपणे घाबरले होते, मला काहीच कळत नव्हते. त्यानंतर त्याने शर्टचे बटण काढले, पॅन्ट काढली आणि माझे कपडे काढण्याचा प्रयत्न केला. आमच्यात झोम्बाझोम्बी झाली आणि माझी मॅक्सी माझ्या मानेजवळ आणि छातीजवळ फाटली. भांडणाच्या वेळी त्याने माझी निकर खाली खेचली आणि हाताने त्याचे गुप्त अंग बाहेर काढले आणि माझ्या गुप्त अंगामध्ये घुसवण्याचा प्रयत्न केला. मग मी त्याला जोरात ढकलले आणि मी दरवाजा उघडून बाहेर पळत सुटले, मग तो म्हणाला, "तु बाहेर जाऊन याबद्दल काही बोलली तर मी तुला आणि तुझ्या कुटुंबाला मारून टाकीन." तो अशी धमकी देत होता तरी देखील मी खोलीतून बाहेर पडले ..."

३.४ अपीलकर्ती / अभियोक्ती यांचे प्रकरण असे आहे की उत्तरवादी क्रमांक

2/आरोपीची बाजू घेण्यासाठी आणि त्याला वाचवण्यासाठी पोलिसांनी तिच्या निवेदनातील एक महत्त्वाचा भाग जाणूनबुजून काढून टाकला. एफ आय आर ( प्रथम खबरी अहवाल ) नोंदवताना केवळ भ. द. वि. कलम 354 , 354-बी आणि 506 अंतर्गत गुन्ह्यांचा फक्त उल्लेख केला होता. उत्तरवादी क्र. 2/आरोपीने तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप केल्यावरही पोलिसांनी मुद्दाम अपीलकर्ती / अभियोक्तीला वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले नाही; ५ ऑगस्ट २०२२ रोजी रात्री सुमारे ११. ०० वाजता अपीलकर्ती / अभियोक्ती यांनी फोन केल्यावर पोलीस हॉटेलमध्ये आले आणि त्यांनी तिला व उत्तरवादी क्रमांक 2/आरोपी यांना पोलीस ठाण्यात नेले, तरीही तिला ६ ऑगस्ट २०२२ रोजी रात्री ११:३० वाजेपासून ते पहाटे ५:०० वाजेपर्यंत थांबवले आणि त्या कालावधीत, उत्तरवादी क्रमांक 2/आरोपी यांच्याशी प्रकरण मिटवण्यासाठी तिच्यावर सतत दबाव टाकला जात होता; जेव्हा अपीलकर्ती / अभियोक्ती कोणत्याही तोडग्यासाठी सहमत झाली नाही , तेव्हा पोलिसांना एफ आय आर ( प्रथम खबरी अहवाल ) नोंदवण्यास भाग बसले परंतु तरीही, त्यांनी उत्तरवादी क्रमांक 2/आरोपीच्या घुण्याची तीव्रता त्याला मदत करण्याच्या हेतूने कमी केली.

**<u>घटना क्रम :</u>**

**4.** ६ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारच्या वेळी, पोलिसांनी उत्तरवादी क्रमांक 2/आरोपीला अतिरिक्त

मुख्य महानगर दंडाधिकारी,[6] न्यायालय क्रमांक २२, अंधेरी, मुंबई यांच्या न्यायालयासमोर हजर केले आणि त्याची न्यायालयीन कोठडी मागितली सबब २० ऑगस्ट २०२२ पर्यंत विद्वान ए सी एम एम ( अतिरिक्त महानगर दंडाधिकारी ) यांनी ती मंजूर केली. त्याचवेळी उत्तरवादी क्रमांक 2/आरोपींनी जामिनासाठी[7] अर्ज दाखल केला. राज्याच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकिलांनी गुन्हा अजामीनपात्र असल्याच्या कारणास्तव विरोध केला; आणि फौजदारी प्रक्रिया संहिता[8] कलाम १६४ नुसार पीडितेचचा बयाण नोंदवणे बाकी होते , तपास अजून चालू होता आणि जर आरोपीला जामिनावर सोडले तर तो पुराव्याशी छेडछाड करू शकतात असे मांडण्यात आले . तथापि, ०६ ऑगस्ट २०२२ रोजीच्या ए सी एम एम यांनी दिलेल्या आदेशाद्वारे सदर अर्जास परवानगी देण्यात आली.

5. तपास पथकाने अवलंबलेल्या हलगर्जीपणामुळे व्यथित झालेल्या याचिकाकर्तीने / फिर्यादीने त्या क्षेत्रातील पोलिस उपायुक्तांशी संपर्क साधला, त्यांनी पोलिसांना सक्रिय केले आणि ७ ऑगस्ट २०२२ रोजी तिला पुढील जबाब नोंदविण्यासाठी बोलावले. या जबाबाच्या आधारे एफ आय आर ( प्रथम खबरी अहवाल )मध्ये भा दं वि कलम ३७६ अन्वये गुन्हा जोडण्यात आला. त्यामुळे भा दं वि कलम ३७६ , 354, 354-बी, 506 आणि 506 (2) अन्वये एफ आय आर दाखल करण्यात आला आहे. त्याच दिवशी तपास अधिकाऱ्याने अपीलकर्त्या स्त्री ला / फिर्यादीला पत्र पाठवून ८ ऑगस्ट २०२२ रोजी वैद्यकीय तपासणीसाठी हजर राहण्याची विनंती केली. ८ ऑगस्ट २०२२ रोजी

6संक्षेपासाठी ए सी एम एम
7जामीन अर्ज क्रमांक २२७९ / □□□□ / २०२२
8संक्षेपासाठी सी आर पी सी

एका महिला पोलिस अधिकाऱ्यासह याचिकाकर्त्याला/ फिर्यादीला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात नेण्यात आले जिथे डॉक्टरांनी तिची वैद्यकीय तपासणी केली आणि खालील गोष्टी नोंदविल्या :-

पीडितेने भूतकाळातील प्रसंग कथित केला - तिचे वय २५ वर्षे, स्त्री, मरोळ, अंधेरी पश्चिम येथील हॉटेल सिल्व्हर इन मध्ये जिग्नेश मेहता, पुरुष, ४८ वर्षे, यांच्याशी पीडितेची भेट ५.८.२०२२ रात्री ११.१५ च्या सुमारास झाली. जिग्नेशने पीडितेच्या गुप्तांगावर, स्तनावर, ओटीपोटावर स्पर्श केला आणि तिचा गळा पकडून तिला जीवे मारण्याची धमकी दिली आणि स्वतःचे कपडे आणि पीडितेच्या कपडे जबरदस्तीने काढून टाकले आणि एकदा योनीमध्ये आपले जननेंद्रिय, लिंग घातले. त्यानंतर पीडित यक्ती ने जिग्नेशला धक्का देऊन तिने खोलीतून पळ काढला.

लैंगिक अत्याचार, शाब्दिक हल्ला, आणि प्रत्यक्ष हल्ला झाल्याचा प्रसंग होता ....

५.१ तपास अधिकारी ज्या पद्धतीने तपास करत होते त्याबद्दल असमाधानी असलेल्या अपीलकर्त्या / फिर्यादीने म्हटले आहे की तिने १०/०८/२०२२ रोजी अतिरिक्त पोलिस आयुक्त, पश्चिम क्षेत्र यांना एक अर्ज सादर केला ज्यात तिने तपास योग्य प्रकारे पार पाडण्याची खात्री करावी आणि उत्तरवादी क्रमांक 2 / आरोपीला अटक करावी अशी विनंती केली.

५.२ १० ऑगस्ट २०२२ रोजी, पोलिसांनी विद्वान एसीएमएम यांच्याकडे अर्ज दाखल

करून त्यात मागणी केले कि 8 ऑगस्ट २०२२ च्या अर्जाद्वारे एफ आय आर मध्ये कलम ३७६ आय पी सी अंतर्गत गुन्हा वाढवण्यात आणलेला आहे आणि म्हणून उत्तरवादी क्रमांक 2 / आरोपीला दिलेला जामीन रद्द व्हावा. सदर अर्ज मंजूर करण्यात आला आणि २३ ऑगस्ट २०२२ च्या आदेशान्वये विद्वान एसीएमएम यांनी 6 एप्रिल २०२२ रोजी उत्तरवादी / आरोपीला दिलेला जामीन रद्द केला.

५.३ दिनांक ०६ सप्टेंबर २०२२ रोजी, अपीलार्थी/अभियोक्ता यांचे पुरवणी निवेदन पोलिसांनी नोंदवले ज्यामध्ये तिने खालीलप्रमाणे नमूद केले :-

> "…..मी त्याला लगेच नकार दिला पण तो पलंगावरून उठला आणि जबरदस्तीने मला पलंगावर ढकलले. त्याने माझ्या छातीला आणि मागच्या भागाला अयोग्यरित्या स्पर्श केला आणि मी घातलेला गाऊन मागे ओढला. मी आरडाओरड करून माझ्यासोबत असे कृत्य करू नये म्हणून त्याला विनंती केली पण त्याने माझी मान पकडली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. त्या वेळी भयंकर भीतीने मी पूर्णपणे घाबरले होते आणि काहीही विचार करू शकले नाही. त्यानंतर त्याने शर्टची बटणे काढली, पँट काढली आणि माझे कपडे घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच्या हाणामारीत माझा गाऊन माझ्या मानेजवळ आणि स्तनाजवळ फाटला. संघर्षादरम्यान त्याने माझी निकर ( चड्डी ) खाली खेचली, त्याचे लिंग त्याने बाहेर काढले आणि माझ्या गुप्त अंगामध्ये घुसवले ……. "

५.४. दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी उत्तरवादी क्रमांक २/आरोपीने भा दं वि कलम ४३८ अन्वये अटकपूर्व जामिनासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बोरिवली विभाग, दिंडोशी (बोरिवली विभाग), गोरेगाव, मुंबई यांच्या न्यायालयात अर्ज[9] दाखल केला. राज्य सरकार आणि अपीलकर्त्या/फिर्यादीचे वकील यांनी या प्रकरणात हस्तक्षेप अर्ज दाखल केला आणि त्यांनी केलेल्या यांनी केलेले युक्तिवाद तसेच आरोपीच्या वतीने केलेला युक्तिवाद लक्षात घेतल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी उत्तरवादी क्रमांक २/आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज खालील निरीक्षणांसह फेटाळून लावला :-

“ १२ सीआरपीसीच्या कलम ४३८ अन्वये दाखल केलेल्या अर्जात अर्जदाराने असामान्य आणि विचित्र वाटणाऱ्या अनेक तथ्यांचा उल्लेख केला आहे. पीडितेने तिच्या मित्रांसोबत आयोजित केलेल्या हनी ट्रॅपचा आपण बळी असल्याचा दावा अर्जदाराने केला असला, तरी अर्जाच्या परिच्छेद क्रमांक ८ मध्ये अर्जदाराने असा युक्तिवाद केला आहे की, तो क्लब एमराल्डचा आजीवन सदस्य आहे, जिथे तो मनोरंजन आणि तंदुरुस्तीसाठी जात असे. अर्जाच्या परिच्छेद क्रमांक १४ मध्ये प्रथमदर्शनी जे सांगितले आहे ते सामान्य मानवी वर्तणुकीच्या पद्धतीत मान्य वाटत नाही. अर्जदार स्वत:ला नामांकित व्यावसायिक असल्याचा दावा करीत असून तो क्लबमध्ये आजीवन सदस्य म्हणून येत असे, असे त्याने परिच्छेद क्रमांक १४ मध्ये नमूद केले आहे की, हॉटेलच्या या खोलीत फिर्यादीने त्याला बोलावले आणि तिने त्याच्या मानेवर आणि गालावर

9१ ३ ६ ७ □□□□ /२२

चुंबन घेण्यास सुरुवात केली आणि अर्जदाराच्या शरीरावर हात ही चोळू लागली आणि जेव्हा अर्जदाराने तिला थांबवले तेव्हा फिर्यादी अधिक आक्रमक झाली आणि तिने अचानक अर्जदाराकडे १५,००,०००/- रुपयांची मागणी केली.

१३. अर्जात नमूद केलेल्या आधारांचा विचार केल्यास असे स्पष्ट होते की, घटनेच्या वेळी तो संबंधित हॉटेलच्या खोलीत पीडिते सोबत होता, यावर अर्जदाराने वाद घातला नाही. पुरवणी निवेदनातील मजकुराकडे दुर्लक्ष केले तरी एफ आय आर मधील तथ्ये प्रथमदर्शनी आय पी सी च्या कलम ३७६ अन्वये गुन्हा सिद्ध करतात. त्यामुळे वरील आरोपांच्या अनुषंगाने गुन्ह्याचे गांभीर्य आणि शिक्षेचे स्वरूप लक्षात घेता अर्जदाराकडून सीआरपीसी कलम ४३८ अन्वये जामीन मंजूर करण्यासाठी प्रथमदर्शनी कोणताही बाजू तयार केली जात नाही, असे माझे मत आहे.

<u>आक्षेपार्ह आदेश</u>

६. उत्तरवादी क्र. 2/आरोपी नंतर अटकपूर्व जामीन[10] मागण्यासाठी उच्च न्यायालयात गेले. दिनांक २१ सप्टेंबर २०२२ च्या पहिल्या वादग्रस्त आदेशानुसार, उत्तरवादी क्रमांक 2/आरोपींना खालील आदेशासह अंतरिम संरक्षण देण्यात आले:-

> “१. अर्जदाराचे वकील आणि राज्यासाठी एपीपी ( सहाय्यक सरकारी अभियोक्ता ) यांचा युक्तिवाद ऐकला .

10अटकपूर्व जमीन अर्ज क्रमांक २५९४/२०२२

२. व्यवसायाने मॉडेल असलेल्या फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक ६/८/२०२२ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात २०२२ चा सी. आर. क्र. २०२२ दाखल करण्यात आला व अर्जदाराने आपला विनयभंग केल्याची तक्रार पोलीस ठाण्यात दिली  यामुळे भा दं वि कलम ३५४, ३५४-ब, ५०६ अन्व्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

त्याच दिवशी म्हणजे ०६/१०/२०२२ रोजी फिर्यादीने तिचा पुरवणी जबाब नोंदवला आणि यावेळी तिने तो पुढे घेऊन घटनेचा तपशील सांगितला आणि सांगितले की, चुकीच्या पद्धतीने स्पर्श केल्यानंतर तिला पलंगावर ढकलण्यात आले आणि जबरदस्तीने संभोग करण्याचा प्रयत्न करण्यात आला. झालेल्या हाणामारीत तिने परिधान केलेले कपडे फाटले होते आणि तिने त्याला दरवाजाबाहेर ढकलले, मात्र खोलीतून बाहेर पडताना त्याने ही घटना कोणालाही सांगू नका, अशी धमकी दिली. तिने रिसेप्शन विभागात  येऊन फोन केला.

एका महिन्यानंतर म्हणजे ०६/०९/२०२२ रोजी फिर्यादीच्या कथनामध्ये आणखी बदल झाला  आहे, जिथे ती म्हणते की लिंग प्रवेशाचा अत्याचार झाला होता आणि तिने त्याला धक्का बुक्की केली आणि रिसेप्शनमध्ये पाळली असे दुसरे वर्णन तसेच राहते.

३. आधीच्या प्रसंगी अर्जदाराची जामिनावर सुटका करण्यात आली होती, जेव्हा विषय सी.आर. (गुन्हा नोंद )  आय पी सी   च्या कलम ३५४, ३५४-ब आणि ५०६ अंतर्गत नोंदवला होता , परंतु

पुरवणी जबाब नोंदविल्यानंतर सी.आर. मध्ये कलम ३७६ जोडले गेले आणि पूर्वीचा आदेश त्याच्या बाजूने असूनही, अर्जदाराला त्याच्या अटकेची भीती आहे, तरीही पूर्वीचा आदेश रद्द करण्यात आला. फिर्यादीच्या कथनातील लगोलग भिन्नता पाहता, त्याची सत्यता न तपासता, या टप्प्यावर, ही भिन्नता आम्हाला अंतरिम आदेशाद्वारे अर्जदाराचे संरक्षण करण्यास प्रवृत्त करते. तपासात त्यांनी केलेले सहकार्य आणि तपास अधिकाऱ्यांसमोर येणारे पुरावे यांच्या अधीन राहून त्यांची कोठडीत चौकशी करणे आवश्यक आहे का, याबाबत पुढील कार्यवाही निश्चित केली जाईल. म्हणून, खालील आदेश:

## आदेश:

अ) एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखलअसलेल्या सीआर क्रमांक ९१५ च्या अनुषंगाने अटक झाल्यास अर्जदार-जिग्नेश जसवंतराय मेहता यांना रु.25,000/- च्या पी.आर.बाँड ( वैयक्तिक जातमुचलका ) भरून तेवढ्याच रकमेच्या एक किंवा दोन जमीनदारांचे जमीन घेऊन जामिनावर सोडण्यात येईल.

(ब) अर्जदाराने 27 ते 30 सप्टेंबर २०२२ या कालावधीत दुपारी 2.00 ते 5.00 या वेळेत संबंधित पोलिस ठाण्यात हजेरी लावावी.

(क) अर्जदाराने खटल्याच्या वस्तुस्थितीशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही प्रलोभन, धमकी किंवा आश्वासन देऊ नये जेणेकरून त्याला न्यायालय

किंवा कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला वस्तुस्थिती उघड करण्यापासून परावृत्त केले जाईल आणि त्याच्याकडून पुराव्यांशी छेडछाड केली जाणार नाही.

दिनांक ७/१०/२०२२ रोजीच्या यादीमध्ये हे प्रकरण समाविष्ठ करण्यात यावे.

६. १. वरील आदेश पारित झाल्याचे कळताच अपीलकर्त्या स्त्री /फिर्यादी यांनी उच्च न्यायालयात हस्तक्षेपासाठी[11] अर्ज दाखल केला. 7 ऑक्टोबर २०२२ च्या दुसर् या आदेशाद्वारे, उत्तरवादी क्रमांक 2/आरोपीने दाखल केलेला जामीन अर्ज खालील आदेशासह मंजूर करण्यात आला :-

२. फिर्यादीच्या आवृत्तीत झालेली सुधारणा आणि तीही एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीनंतर आल्याने अर्जदाराला अंतरिम आदेशाद्वारे संरक्षण देण्यात आले आणि त्याला तपास अधिकाऱ्याकडे अहवाल देण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार त्यांनी तपास अधिकाऱ्यांना कळवले असून, त्यांची वैद्यकीय तपासणी करून मोबाइल जप्त करण्यात आला.

३. वरील पार्श् वभूमीवर अर्जदाराने तपासात सहकार्य केल्याने दिनांक 21/09/२०२२ चा आदेश निरपेक्ष करण्यात आला आहे.

७. वरील दोन आदेशांमुळे व्यथित झालेल्या अपीलकर्त्या स्त्री ने / फिर्यादीने सध्याचा

11 अटकपूर्व जमीन अर्ज क्रमांक २५९४/२०२२ मध्ये हस्तक्षेप अर्ज क्रमांक १७१५० /२०२२ / २२ दिनांक ६/१०/२०२२

आपील केला आहे, ज्यामध्ये 18 नोव्हेंबर २०२२ रोजी नोटीस जारी करण्यात आली होती. उत्तरवादी क्रमांक १ - राज्य आणि उत्तरवादी क्रमांक २/आरोपी यांच्या वतीने पुढील सुनावणीच्या तारखेपूर्वी हजेरी नोंदविण्यात आली आणि प्रतिप्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी मुदत देण्यात आली. उत्तरवादी क्रमांक १/राज्य आणि उत्तरवादी क्रमांक २/आरोपीयांच्या वकिलांनी प्रतिप्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

## पक्षकारांच्या विद्वान वकिलांनी मांडलेले युक्तिवाद:

### अ. अपीलकर्ता/फिर्यादी यांचे वकील

८. अटकपूर्व जामीन मंजूर करताना उत्तरवादी क्रमांक २/आरोपींवरील आरोपांचे स्वरूप व गांभीर्य लक्षात घेण्यात उच्च न्यायालय अपयशी ठरले आहे, असा आग्रह अपीलकर्त्या स्त्री / फिर्यादी यांच्यावतीने ज्येष्ठ वकील आर. बसंत यांनी केला आहे. पहिल्या आदेशात असे निरीक्षण नोंदवताना "फिर्यादीच्या कथनात स्टार व्हेरिएशन ( सतत पवित्र बदलणे किंवा वारंवार बदलणे ) असा निष्कर्ष र्जदाराचे रक्षण करण्यासाठी मला प्रभावित करतो ", एफ आय आर मध्ये नोंदवलेले आरोप आय पी सी च्या कलम ३७६ अन्वये गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहेत, हे उच्च न्यायालयाने मान्य केले नाही; उच्च न्यायालयाने १७ सप्टेंबर २०२२ रोजीच्या आदेशात बोरिवलीच्या अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी केलेल्या निरीक्षणांकडे दुर्लक्ष केले., उत्तरवादी क्रमांक २/आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला होता कारण की पुरवणी जबाबांमधील

मजकुराकडे दुर्लक्ष केले गेले तरी एफ आय आर मध्ये केलेले दावे प्रथमदर्शनी कलम ३७६ भा दं वि अंतर्गत गुन्हा ठरतात; अटकपूर्व जामिनासाठी च्या अर्जात अपीलकर्ती / फिर्यादीने दाखल केलेला हस्तक्षेप अर्ज [12]असूनही त्यामध्ये तिला बाजू मांडण्याची संधी दिली नाही. उत्तरवादी क्रमांक २/आरोपीच्या जामिनाच्या[13] अर्जावर विचार करताना आणि त्याला अटकपूर्व जामीन देण्याचा आदेश देताना आवश्यक असलेल्या कायदेशीर तत्त्वांचे उल्लंघन करणारा हा प्रकार आहे , जसे या न्यायालयाने प्रशांत कुमार सरकार विरुद्ध आशिष चॅटर्जी आणि इतर[14] सह अनेक न्यायालयीन निकालांमध्ये हे नमूद केले आहे; उत्तरवादी क्रमांक २/आरोपी हा एक श्रीमंत आणि प्रभावशाली व्यापारी आहे ज्याने एफ आय आर दाखल करण्यास उशीर करण्यासाठी आपल्या प्रभावाचा वापर केला आणि अटकपूर्व जामीन मंजूर केला गेला, या वस्तुस्थितीकडे उच्च न्यायालयाने दुर्लक्ष केले, हे अपीलकर्त्या / फिर्यादीच्या साक्षीदारांना नुकसानीसाठी प्रभावित करेल.

**B.** उत्तरवादी क्र. २/आरोपी साठी वकील

९. दुसरीकडे, उत्तरवादी क्रमांक 2/आरोपीच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वरिष्ठ वकील श्री. संजय आर. हेगडे यांनी आक्षेपार्ह आदेशाचा बचाव केला आहे आणि म्हटले आहे की उत्तरवादी क्रमांक 2/ आरोपीला अंतरिम संरक्षण देणारा पहिला आदेश पारित झाल्यानंतर त्यांना अनेक तारखांना चौकशीसाठी बोलावले गेले होते आणि त्यांनी योग्य सहकार्य केले आहे आणि पोलिस

12अटकपूर्व जमीन अर्ज क्रमांक २५९४/२०२२ मध्ये हस्तक्षेप अर्ज क्रमांक १७१५०/२०२२ / २२
13 अटकपूर्व जमीन अर्ज क्रमांक २५९४/२०२२
14(२०१०) १४ एस सी सी ४९६

स्टेशनला जेव्हा जेव्हा बोलावले गेले तेव्हा ते हजर राहिले आहेत. ते एसीएमएम, अंधेरी आणि माननीय अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बोरिवलीची यांच्या न्ययालयात सुनावणीसाठी हजर राहिलेले आहेत . कथित घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही; परिस्थितीजन्य पुरावे आणि वैद्यकीय अहवाल उत्तरवादी क्रमांक 2 / आरोपीविरूद्ध अपीलकर्ती / फिर्यादीने केलेल्या आरोपांचे समर्थन करत नाहीत; आरोपीला अटकपूर्व जामीन देण्याच्या आदेशात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही औचित्य नाही, विशेषत: जेव्हा अपीलकर्ता / फिर्यादी किंवा राज्याच्या वकिलांनी जामीन रद्द करण्याची कोणतीही प्रतिकूल परिस्थिती निदर्शनास आणून दिलेली नाही.

## राज्य सरकार तर्फे वकील - उत्तरवादी क्रमांक १

१०. या प्रकरणी सत्र न्यायालयात २१ ऑक्टोबर २०२२ रोजी दोषारोपपत्र[15] दाखल करण्यात आले असून सरकारी पक्षाकडून २५ साक्षीदारांचा दाखला देण्यात आला असून त्यापैकी १२ स्वतंत्र साक्षीदार आहेत, अशी माहिती राज्य सरकारचे वकील नितीन लोणकर यांनी न्यायालयाला दिली. हे प्रकरण आता २७ जुलै २०२३ रोजी आरोपपत्रावर युक्तिवादासाठी सूचीबद्ध करण्यात आले आहे.

## विश्लेषण, व्याख्या आणि संदर्भीय निर्णय :

११. आम्ही पक्षकारांच्या वकिलांचे म्हणणे ऐकले आहे आणि अभिलेखावरील नोंदींचे अवलोकिण

15परि. ८- तपस अधिकाऱ्याने प्रतिज्ञापत्र दाखल केले.

केलेले आहे. या आदेशाच्या अवलोकनावरून लक्षात येते की, उत्तरवादी क्रमांक २/आरोपीला अंतरिम संरक्षण देण्यास उच्च न्यायालयाला राजी करणारा प्राथमिक आधार म्हणजे अपीलकर्त्या स्त्री ने / फिर्यादीने तिच्या ०६ ऑगस्ट, २०२२ रोजी पहाटे एफ आय आर मध्ये ( प्रथम खबरी अहवालात ) नोंदवलेल्या आणि त्याच तारखेला संध्याकाळी नोंदवलेल्या तिच्या पहिल्या पुरवणी निवेदनात आणि एक महिन्यानंतर नोंदवलेल्या दुसऱ्या पुरवणी निवेदनात, 06 सप्टेंबर २०२२ रोजी यामध्ये

अतिरिक्त आरोप करून वाढ केलेली होती. उच्च न्यायालयाच्या शब्दांत सांगायचे तर , "फिर्यादीच्या कथनात स्टार व्हेरिएशन होते....". दुसऱ्या आदेशात वरील निरीक्षणाचा पुनरुच्चार करण्यात आला असून उत्तरवादी क्रमांक २/आरोपीने तपास अधिकाऱ्याला अहवाल दिला होता, त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती आणि मोबाइल फोन जप्त करण्यात आला होता, यापूर्वी दिलेला अंतरिम आदेश निरपेक्ष[16] करण्यात आला होता.

११.१ आम्ही अटकपूर्व जामीन देण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्या बाबींचा विचार केला पाहिजे याचा त्वरित विचार करण्याचा प्रस्ताव ठेवतो. जामिनाच्या अर्जावर निर्णय घेताना न्यायालयाने पुराव्यांचे सविस्तर विश्लेषण करणे टाळावे, आरोपीने गुन्हा केला आहे की नाही हे दर्शविणारी काही वाजवी कारणे किंवा गुन्ह्याचे गांभीर्य प्रतिबिंबित करणारी वस्तुस्थिती विचारात घेण्यासह प्रथमदर्शनी मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, ही वस्तुस्थिती अधोरेखित करणारी या

16२१ /९/२०२२ चा दुसरा वादग्रत आदेश.

न्यायालयाच्या निर्णयांची एक ओळ आहे. त्या टप्प्यावर पुराव्यांच्या विश्लेषणात खोलवर जाण्यावर स्वयंघोषित निर्बंध वैध कारणांसाठी आहेत, म्हणजे फिर्यादी किंवा बचाव पक्षाने स्थापन केलेल्या खटल्यात कोणताही पूर्वग्रह होऊ नये आणि खटला संपेपर्यंत प्रकरणाचे सर्व पैलू खुले ठेवावेत.

१२. प्रशांत कुमार सरकारच्या खटल्यात (सुप्रा), या न्यायालयाच्या खंडपीठाने अटकपूर्व जामीन अर्जावर विचार करताना कोणत्या बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत यावर प्रकाश टाकला होता आणि असे नमूद केले होते की :-

> 9. आमचे असे मत आहे की हा आदेश टिकून राहू शकत नाही. आरोपींना जामीन मंजूर किंवा फेटाळण्याच्या उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात हे न्यायालय सहसा हस्तक्षेप करत नाही हे काही नवीन नाही तथापि, या मुद्द्यावर या न्यायालयाच्या अनेक निर्णयांमध्ये नमूद केलेल्या मूलभूत तत्त्वांचे काटेकोरपणे, सावधपणे आणि काटेकोरपणे पालन करणे उच्च न्यायालयावर तितकेच जोखमीचे आहे. हे सर्वमान्य आहे की, इतर परिस्थितींव्यतिरिक्त, जामीन अर्जावर विचार करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत:
>
> (i) आरोपीने गुन्हा केला आहे असे मानण्याचे कोणतेही प्रथमदर्शनी किंवा वाजवी कारण आहे का;
>
> (२) आरोपाचे स्वरूप व गांभीर्य;

(iii) दोषी आढळल्यास शिक्षेची तीव्रता;

(४) जामिनावर सुटल्यास आरोपी पळून जाण्याचा किंवा पळून जाण्याचा धोका;

(५) आरोपीचे चारित्र्य, वर्तन, साधन, स्थान व स्थान;

(६) गुन्ह्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता;

(७) साक्षीदारांवर प्रभाव पडण्याची रास्त भीती; आणि

(८) अर्थातच जामीन मिळाल्याने न्यायाला खीळ बसण्याचा धोका.

[पाहा सीबीआय विरुद्ध अमरमणि त्रिपाठी[17], प्रल्हाद सिंग भाटी  विरुद्ध एनसीटी, दिल्ली आणि इतर [18]आणि राम गोविंद उपाध्याय विरुद्ध सुदर्शन सिंह आणि इतरांमार्फत उत्तर प्रदेश राज्य[19]]

१३. मन्सूर  वि. उत्तर प्रदेश राज्य [20]आणि इतर या प्रकरणामध्ये न्यायमूर्ती डी. के. जैन यांच्या खंडपीठाने असे मत मांडले कि न्यायालयांनी यांत्रिक पद्धतीने जामीन देणे टाळावे आणि संबंधित विचारांच्या अभावामुळे अशा आदेशात हस्तक्षेप होण्याची शक्यता असते,  असे मत या आदेशाचा परिच्छेद १३ समर्पकपाने  असून तो खाली दिला आहे :-

"१३. ...... जामीन मंजूर करताना पुराव्याची सविस्तर तपासणी आणि खटल्याच्या गुणवत्तेला स्पर्श करणारी सविस्तर कारणे, ज्यामुळे आरोपी संदर्भात  पूर्वग्रह होऊ

17(२००५ ) ८ एस सी सी २१
18 (२००१ ) ८ एस सी सी २८०
19 (२००२ ) ८ एस सी सी ५९८
20 (२००९ ) ८ एस सी सी २८६

शकतो, हे टाळले पाहिजे, परंतु जामीन का दिला जात आहे, याची कारणे अशा आदेशात दर्शविण्याची गरज आहे , विशेषत: जेव्हा आरोपीवर गंभीर गुन्हा केल्याचा आरोप असतो.

(हे ही पहा महाराष्ट्र राज्य विरुद्ध रितेश,[21] पंचानन मिश्रा विरुद्ध दिगंबर मिश्रा आणि इतर[22], विजय कुमार विरुद्ध नरेंद्र आणि इतर[23] आणि अन्वरी बेगम विरुद्ध शेर मोहम्मद आणि इतर[24])"

[हे ही पहा : नीरू यादव विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि इतर[25]; अनिल कुमार यादव वि. राज्य (एनसीटी दिल्ली) आणि दुसरा[26] आणि महिपाल विरुद्ध राजेश कुमार ऊर्फ पोलिया आणि दुसरा[27]]

१४. आरोपींचे जामीन अर्ज फेटाळण्यात आलेले आहेत त्या आधीच्या आदेशांकडे लक्ष देण्याची गरज यावर भर देऊन, कल्याण चंद्र सरकार विरुद्ध राजेश रंजन उर्फ पप्पू यादव आणि दुसरा [28] मधील या न्यायालयाने असा निर्णय दिला कि :-

“१२. ज्या प्रकरणांमध्ये पूर्वीचे जामीन अर्ज फेटाळण्यात आले आहेत, अशा प्रकरणांमध्ये आधीचे जामीन अर्ज कोणत्या आधारावर फेटाळण्यात आले आहेत हे लक्षात घेऊन जामीन मंजूर

21 (२००१) ४ एस सी सी २२४
22 (२००५ ) ३ एस सी सी १४३
23 (२००२ ) ९ एस सी सी ३६४
24 (२००५ ) ७ एस सी सी ३२६
25 (२०१४ ) १६ एस सी सी ५०८
26 (२०१८ ) १२ एस सी सी १२९
27 (२०२० ) २ एस सी सी ११८
28 (२००४ ) ७ एस सी सी ५२८

करण्याच्या पुढील अर्जाचा विचार करण्याची पुढील जबाबदारी न्यायालयावर आहे आणि अशा विचारानंतर जर न्यायालयाचे असे मत असेल की जामीन मंजूर करावाच लागेल तर संबंधित न्यायालयाने ते फेटाळले असले तरी का जमीन द्यावा याची विशिष्ट कारणे द्यावी लागतील आणि त्यानंतरच जामिनासाठी अर्ज मंजूर करण्यात यावा.

१५. सुशीला अग्रवाल आणि इतर वि. राज्य (एनसीटी ऑफ दिल्ली) आणि इतर[29] या प्रकरणात पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने विचारार्थ तयार केलेल्या खालील दोन प्रश्नांवर वेगवेगळ्या संख्यांच्या गटाच्या विविध खंडपीठाच्या, परस्परविरोधी मतांचा, सामना करावा लागला :-

> "(i) सीआरपीसीकलम ४३८ अन्वये एखाद्या व्यक्तीला देण्यात आलेले संरक्षण ठराविक कालावधीपुरते मर्यादित ठेवावे, जेणेकरून ती व्यक्ती कनिष्ठ न्यायालयासमोर शरण येऊ शकेल आणि नियमित जामीन मिळवू शकेल.

(२) अटकपूर्व जामिनाचे आयुष्य न्यायालयाने समन्स बजावलेल्या वेळी व टप्प्यावर संपावे का? सविस्तर चर्चेनंतर घटनापीठाने कायद्याची अंमलबजावणी केली आणि परिच्छेद ९१ मधील वरील संदर्भाचे उत्तर खालील शब्दांत दिले :-

> "९१. १ प्रश्न १ बद्दल, हे न्यायालय असे म्हणते की कलम 438 सीआरपीसी अंतर्गत एखाद्या व्यक्तीला दिलेले संरक्षण नेहमीच ठराविक कालावधीपुरते मर्यादित असू नये; वेळेचे कोणतेही बंधन न ठेवता ते आरोपीच्या बाजूने असायला हवे. कलम 437 (3)

29 (२०२० ) ५ एस सी सी १

आणि कलम 438 (2) अंतर्गत सामान्य अटी लागू केल्या पाहिजेत; कोणत्याही गुन्ह्यासंदर्भात विशिष्ट तथ्ये किंवा वैशिष्ट्ये असल्यास न्यायालयाला कोणतीही योग्य अट (सवलतीचे निश्चित स्वरूप, किंवा एखाद्या घटनेशी संदर्भात असणे) इत्यादी लागू करणे खुले आहे.

९१.२ या न्यायालयाकडे असलेल्या दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात, असे म्हटले जाते की अटकपूर्व जामीन आदेशाचे आयुष्य किंवा कालावधी सामान्यत: आरोपीला न्यायालयाने समन्स बजावताना किंवा आरोप निश्चित करण्याच्या वेळी संपत नाही, परंतु खटला संपेपर्यंत चालू राहू शकतो. अटकपूर्व जामिनाची मुदत मर्यादित ठेवण्याची काही विशेष परिस्थितीत न्यायालयाला आवश्यक असतील, तर तसे करण्यास मार्ग मोकळा आहे."

१६. या संदर्भात सी आर पी सी च्या कलाम ४३८ अन्वये जेव्हा अर्ज दाखल होतो तेव्हा कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावे याबाबत घटनापीठाने आपले मत खालील प्रमाणे मांडले आहे.

९२.३ कलम ४३८ सीआरपीसीमधील सुविधा बहाल करताना कोणतीही गोष्ट न्यायालयांना वेळ किंवा एखादी घटनेपर्यंत जसे कि एफ आय आर दाखल केल्यानंतर किंवा कोणत्याही साक्षीदाराचा जबाब नोंदविताना, तपास किंवा चौकशी दरम्यान इ. मर्यादित वेळेपर्यंत अशा अटी लाभ संकुचित करण्यासाठी भाग पाडत

नाही किंवा बंधनकारक करत नाही. अर्जावर (अटकपूर्व जामीन देण्यासाठी) विचार करताना न्यायालयाला गुन्ह्याचे स्वरूप, त्या व्यक्तीची भूमिका, तपासाच्या प्रक्रियेवर त्याचा प्रभाव पडण्याची शक्यता किंवा पुराव्यांशी छेडछाड (साक्षीदारांना धमकावण्यासह), न्यायापासून पळून जाण्याची शक्यता (जसे की देश सोडून जाणे) इत्यादींचा विचार करावा लागतो.

९२.४ अटकपूर्व जामीन द्यायचा की नाकारायचा याचा विचार करताना गुन्ह्यांचे स्वरूप व गांभीर्य, अर्जदाराची भूमिका आणि खटल्याची वस्तुस्थिती या सारख्या बाबींचा विचार न्यायालयांना मार्गदर्शन ठरू शकतो . मान्यता द्यायची की नाही, हा विवेकी अधिकारक्षेत्राचा विषय आहे; तसेच तसे असेल तर कोणत्या प्रकारच्या विशेष अटी लादाव्यात (किंवा लादल्या जाणार नाहीत) हे खटल्यातील वस्तुस्थितीवर अवलंबून असते आणि न्यायालयाच्या विवेकाच्या अधीन असते.

......... ......... ........ ...... ........

९२.६. अटकपूर्व जामिनाचा आदेश हे "ब्लँकेट" असू नये की जणु यामुळे आरोपीला पुढील गुन्हे करताच येणार नाहीत आणि अटकेपासून बेमुदत संरक्षणाचा दावा करता येणार नाही. एखाद्या विशिष्ट घटनेच्या संदर्भात ज्या गुन्ह्यासाठी किंवा घटनेसाठी अटकेची भीती आहे आणि ते मागितली जाते, त्या गुन्ह्यापुरती ते मर्यादित असावे. भविष्यात एखाद्या गुन्ह्यात घडलेल्या घटनेच्या संदर्भात ते लागू होऊ शकत नाही.

[भर दिला ]

१७. मायकला धर्मराजम आणि इतर वि. तेलंगण राज्य आणि इतर[30] मध्ये असे नमूद केले आहे की, जामीन मंजूर करणाऱ्या संबंधित न्यायालयाने काही विशिष्ट बाबींचा विचार न केल्यास अपीलीय न्यायालय किंवा वरिष्ठ न्यायालय जामीन देण्याचा आदेश रद्द करू शकते, असे निरीक्षण नोंदवत या न्यायालयाने पुढील प्रमाणे म्हटले आहे :-

९. जामीन देण्याच्या आदेशात गंभीर त्रुटी असतील आणि न्यायाची पायमल्ली होत असेल तर जामीन रद्द केला जाऊ शकतो, असा जुनाच नियम आहे. जामीन मंजूर करणाऱ्या न्यायालयाने प्रथमदर्शनी आरोपीचा सहभाग दर्शविणाऱ्या संबंधित सामग्रीकडे दुर्लक्ष केले किंवा आरोपींना जामीन देण्याच्या प्रश्नाशी काहीही संबंध नसलेले अप्रासंगिक असे काही विचारात घेतले, तर उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालयाने जामीन रद्द करणे योग्य ठरेल.

१८. सुप्रीम भिवंडी वाडा मनोर इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध महाराष्ट्र राज्य व दुसरा[31]

१९. प्रदीप राम वि. झारखंड राज्य आणि दुसरा[32] जणांनी फौजदारी खटल्यातील आरोपीला

30(२०२० ) २ एस सी सी ७४३

31(२०१९ ) १७ एस सी सी ३२६

32(२०१९) १७ एस सी सी ३२६

जामीन मिळवून दिल्यानंतर त्यात नंतर नवीन गुन्ह्यांची भर पडली आणि आरोपीला ताब्यात घेण्यासाठी यापूर्वी दिलेला जामीन रद्द करणे आवश्यक आहे का, असा प्रश्न निर्माण झाला, या न्यायालयाच्या खंडपीठाने उच्च न्यायालयांसह अनेक उच्च न्यायालयांनी घेतलेल्या मताची चाचपणी केली राजस्थान, मद्रास, अलाहाबाद आणि जम्मू-काश्मीर तसेच या संदर्भात या न्यायालयाने मागील निर्णयांमध्ये केलेली निरीक्षणे पुढीलप्रमाणे :-

19. प्रदीप राम वि. झारखंड राज्य आणि दुसरा या प्रकरणातील परिस्थिती विचारात घेता येईल ती म्हणजे फौजदारी खटल्यातील आरोपीला जामीन दिल्यानंतर त्यात नंतर नवीन गुन्ह्यांची भर पडली आणि आरोपीला ताब्यात घेण्यासाठी यापूर्वी दिलेला जामीन रद्द करणे आवश्यक आहे का, असा प्रश्न निर्माण झाला, या न्यायालयाच्या खंडपीठाने अनेक उच्च न्यायालयांनी म्हणजेच राजस्थान, मद्रास, अलाहाबाद आणि जम्मू-काश्मीर घेतलेल्या मतप्रवाहाची चाचपणी केली राजस्थान, मद्रास, अलाहाबाद आणि जम्मू-काश्मीर तसेच या संदर्भात, या न्यायालयाने मागील निर्णयांमध्ये केलेली निरीक्षणे, पुढीलप्रमाणे नमूद केलेली आहेत :-

> ३१. वरील चर्चा लक्षात घेता, आरोपीला जामीन मंजूर झाल्यानंतर आणखी दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्ह्यांची भर पडते अशा परिस्थितीसंदर्भात आम्ही खालील निष्कर्षांवर पोहोचतो.
>
> ३१.१ आरोपी आत्मसमर्पण करू शकतो आणि नव्याने जोडलेल्या दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्ह्यांसाठी जामिनासाठी अर्ज करू शकतो. जामीन नाकारल्यास

आरोपीला निश्चित अटक होते.

३१.२ तपास यंत्रणा आरोपीला अटक करण्यासाठी आणि त्याच्या कोठडीसाठी सीआरपीसीकलम ४३७ (५) किंवा ४३९ (२) सीआरपीसी अंतर्गत न्यायालयाकडे आदेश मागू शकते.

३१.३[ इ डी : परिच्छेद ३१.३ दिनांक ३१-७-२०२० च्या अधिकृत पत्राद्वारे सुधारित.] न्यायालय ज्या व्यक्तीला यापूर्वीच जामीन मंजूर झाला आहे, त्याला सीआरपीसी कलम ४३७ (५) तसेच कलम ४३९ (२) अन्वये अधिकाराचा वापर करून त्याचा जमीन रद्द करून आरोपीला ताब्यात घेण्याचे निर्देश देऊ शकते. न्यायालय सीआरपीसी कलम ४३७ (५) तसेच कलम ४३९ (२) अंतर्गत ज्या व्यक्तीला यापूर्वीच जामीन मंजूर झाला आहे, त्याच्यावर गंभीर आणि अजामीनपात्र गुन्ह्यांची वाढ झाल्याने त्याला अटक करण्याचे आणि कोठडीत बंद करण्याचे आदेश देऊ शकते. यामध्ये प्रत्येक प्रकरणात आधीच जमीन रद्द करणे अंतर्भूत असण्याची आवश्यकता नाही.

३१.४. एखाद्या आरोपीला यापूर्वीच जामीन मंजूर झाला असेल, तर एखाद्या गुन्ह्याची त्यामध्ये वाढ झ्झाली असेल तर तपास अधिकारी आरोपीला अटक करू शकनार नाही, परंतु अशा गुन्ह्यात किंवा गुन्ह्यांमध्ये आरोपीला अटक करण्यासाठी जामीन मंजूर केलेल्या न्यायालयाकडून आरोपीला अटक करण्याचे आदेश घेणे आवश्यक आहे.

२०] उपरोल्लेखित ‘प्रदीप राम प्रकरणात नोंदवलेली निरीक्षणे स्पष्टपणे पारखतांना,

ज्यामध्ये, जेव्हा आरोपीचा जामीन अर्ज विचारात घेऊन त्यावर त्याच्या लाभात आदेश पारित करण्यात आला होता आणि जरी न्यायालयाने अगोदर जामीन मंजुरीचा आदेश आरोपीच्या लाभात पारित केला होता तरीही गंभीर गुन्ह्याचा समावेश झाल्याच्या परिस्थितीत न्यायालय आरोपीस अटक करण्याची व त्यास कोठडीत पाठवण्याचे निर्देश देऊ शकते. आरोपीस जामीन मंजूर झाल्यानंतर, पुढील जामीनपात्र आणि अजामीनपात्र गुन्हे प्रथम खबरी अहवाल मध्ये समाविष्ट केल्यावर उद्भवलेल्या परिस्थितीत, प्रत्यार्पण करणे आणि नव्याने समाविष्ट केलेल्या गुन्ह्यांसंबंधात नव्याने जामीनासाठी अर्ज करणे हा पर्याय उपलब्ध असतो. तसेच, तपासी अभिकरणास देखील, जामीन आणि बंधपत्र विषयी नमूद असलेल्या संविधीच्या प्रकरण XXXIIII अंतर्गत, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (५)[33] व ४३९ (२)[34] च्या तरतुदी लागू करून, न्यायालयास आरोपीचा ताबा देण्याविषयी विनंती करण्याचा हक्क आहे. अशा पद्धतीने सादर केलेल्या अर्जावर, न्यायालयाने आरोपीस जामिनावर सोडले असते किंवा अपिलीय न्यायालय/ वरिष्ठ न्यायालय, त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, सदर व्यक्तीस, ज्यास अगोदर जामीनावर मुक्त करण्यात आले होते, त्यास अटक करण्याचे आणि ताब्यात घेण्याचे आदेश देईल.

33सेक्शन ४३७ ( ५ ) जर एखाद्या व्यक्तीला एखाद्या न्यायालयाने जामिनावर सोडले असेल आणि त्यांना जर योग्य वाटले तर ते □□□ □□ (१) व (२) खाली पुनः अटक करून डांबून ठेऊ शकतात .
34उच्च किंवा सत्र न्यायालयाने एखाद्या व्यक्तीस जामिनावर सोडले असेल आणि त्यांना जर योग्य वाटले तर ते पुनः अटक करून डांबून ठेऊ शकतात .

२१] प्रस्तुत प्रकरणामधील वस्तूस्थितीकडे परत वळताना, ही बाब वादातीत नाही की, जेव्हा उत्तरवादी क्रमांक २/ आरोपी याने माननीय अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे समोर दिनांक ०६ ऑगस्ट, २०२२ रोजी जामिनासाठी[35] अर्ज केला होता त्यावेळेस प्रथम खबरी अहवाल मध्ये नमूद गुन्हे हे भारतीय दंड संहिताचे कलम ३५४, ३५४ ब आणि ५०६ या कलमांतर्गत होते. त्यास त्याच दिवशी, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१- अ मधील तरतुदींचे पालन करण्यात आले नाही, या प्राथमिक कारणास्तव जामीन मंजूर करण्यात आला. त्यानंतर, त्याच पप्रथम खबरी अहवाल मध्ये, भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अन्वये गुन्हा सामिल करण्यात आला आणि नंतर सदर गुन्ह्याचे स्वरूप भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६, ३५४, ३५४ ब, आणि ५०६ (२) अंतर्गत अधिक गंभीर बनले. या घटनांच्या पार्श्वभूमीवर, सरकारपक्षाने उत्तरवादी क्रमांक २/ आरोपीचा जामीन रद्द करण्याचे आदेश मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला ज्यात इतर बाबीं सोबतच असे नमूद करण्यात आले होते की, सुरुवातीला आरोपीवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४, ३५४ ब, आणि ५०६ या अंतर्गत दोषारोप ठेवण्यात आला होता. परंतु अपीलकर्ती/ अभियोक्ती हिचा जबाब नोंदविण्याच्या प्रक्रियेमध्ये, लावलेल्या आरोपांमुळे भारतीय दंड विधानच्या कलम ३७६ अन्वये गुन्हा होत असल्याने, सदर कलम प्रथम खबरी अहवालच्या कलमांमध्ये समाविष्ट करण्यात आले आणि म्हणून त्याच्या लाभात मंजूर करण्यात आलेला

35जमीन अर्ज क्रमांक २२७९/ब अ / २०२२ ३६ दिनांक १० ऑगस्ट, २०२२.

जामीन रद्द करावा लागला आणि त्यास ताब्यात घ्यावे लागले. माननीय अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ च्या आदेशान्वये सदर अर्ज मान्य केला. परिणामी, उत्तरवादी क्रमांक २/ आरोपी यास माननीय अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बोरीवली, यांच्यासमोर अटकपूर्व जामीन[36] मिळवण्यासाठी धाव घ्यावी लागली. परंतु, व्यवस्थितरित्या कारणे नमूद केलेल्या आदेशान्वये, सदर अर्ज फेटाळण्यात आला आणि त्याने घेतलेला बचाव की तो एका मोहजालाचा बळी आहे, यावर विश्वास ठेवण्यात आला नाही. उत्तरवारी क्रमांक २/ आरोपी याचे दृढकथन की, अपीलकर्ती/ अभियोक्ती, तिच्या पुरवणी जबाबातील[37] कथनात उत्तरोत्तर सुधारणा करत आहे, हे सुद्धा विचारात घेतले गेले, परंतु फेटाळले गेले आणि असे निरीक्षण नोंदवले की, जरी त्या जबाबांकडे दुर्लक्ष केले गेले तरीही प्रथम खबरी अहवाल मध्ये पुरेशी प्रथमदर्शनी माहिती नमूद केली होती, ज्याआधारे भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अन्वये गुन्हा झाल्याचे सिद्ध होते.

२२]  आश्चर्याची बाब ही की, वरीलपैकी कोणत्याही बाबींचा दोन्ही आक्षेपित आदेशांमध्ये ओझरता उल्लेखही केलेला नाही. आरोप करण्यात आलेल्या गुन्ह्याचे स्वरूप आणि गांभीर्य यांकडे दुर्लक्ष केले आहे. त्याचप्रमाणे, त्याचतुलनेत आरोपीची तसेच अपीलकर्ती/ अभियोक्ती हिची आर्थिक, नैतिक पातळी, त्याचे स्थान आणि नावलौकिक यांकडेही दुर्लक्ष

36दिनांक १० ऑगस्ट २०२२
37दिनांक ०६ ऑगस्ट २०२२ आणि ६ सप्टेंबर २०२२.

करण्यात आले आहे. उच्च न्यायालय यांनी उत्तरवादी क्रमांक २/ आरोपी याच्या लाभात अटकपूर्व जामीन मंजूर करणारा ३ परिच्छेदांचा समावेश असलेला संक्षिप्त आदेश पारित केला जो “अभियोक्तीच्या कथनात मुख्य तफावत आहे” या बाबीमुळे डळमळीत झालेला आहे, याचाच अर्थ असा की, जे प्रथम खबरी अहवाल मध्ये जे मूळचे नोंदले गेले होते, त्यानुसार भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत परिभाषित केल्यानुसार, बलात्काराचा गुन्हा घडला असे म्हणता येणार नाही आणि ते एक चुकीचे गृहीतक आहे. जरी, दिनांक ०६ ऑगस्ट, २०२२ रोजी संध्याकाळी म्हणजे ज्या दिवशी सकाळच्या सत्रात उत्तरवादी क्रमांक २/ आरोपी विरुद्ध प्रथम खबरी अहवाल नोंदवण्यात आला होता त्याच दिवशी अपील करती त्याच दिवशी संध्याकाळी नोंदविलेला अपीलकर्ती/ अभियोक्ती हिचा पुरवणी जबाब दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी नोंदवलेला तिचा दुसरा पुरवणी जबाब डॉक्टरांचे ज्यांनी अपीलकर्ती/ अभियोक्ती हिची तपासणी केली होती त्यांचे मेडिको लिगल अहवाल एका क्षणभरासाठी बाजूला ठेवले तरी, आम्हाला असे आढळून आले की, भारतीय दंड विधानाच्या कलम ३७६ अंतर्गत तरतुदी आकर्षित होण्यासाठी प्रथम खबरी अहवाल मध्ये तरीही पुरेशा महत्त्वाच्या बाबी होत्या. आमच्या मते, या बाबींनी, उच्च न्यायालयास त्यांचा स्वेच्छाधिकार उत्तरवादी क्रमांक २/ आरोपी याच्या लाभात अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासाठी वापरण्यापासून परावृत्त करावयास हवे होते.

२३]   आक्षेपित आदेशांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी, प्रस्तुत न्यायालयास विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे आणि दुसरा   कारण म्हणजे अपीलकर्ती/ अभियोक्ती हिने, उत्तरवादी क्रमांक २/ आरोपी याने उच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या अटकपूर्व जामीनासाठीच्या याचिकेमध्ये हस्तक्षेपासाठी[38] अर्ज दाखल केला. तरीही तिला सुनावणीची संधी दिली नाही. दुसऱ्या आक्षेपित आदेशाचे अवलोकन केल्यानंतर, ही सदरची स्थिती त्यात प्रतिबिंबित झालेली नाही. जरी सदरच्या कार्यवाहीत सरकारपक्षातर्फे प्रतिनिधी हजर होता आणि त्याने प्रतिनिधित्व केले होते, तरीही केवळ याच कारणास्तव अभियोक्तीचा अधिकार संपुष्टात आणावयास नको होता. अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये, जेथे सामान्यतः केवळ अभियोक्ती हिच्या एकटीशिवाय दुसरा कोणताही साक्षीदार नाही, अशावेळी, उच्च न्यायालयाचे अवश्य कर्तव्य होते की त्यांनी अपीलकर्तीचे म्हणणे ऐकून घ्यायला हवे होते.

२४]   आमचे मत हे, जगजीत सिंग आणि इतर विरुद्ध आशिष मिश्रा उर्फ मोनू आणि इतर [39]या प्रकरणामध्ये तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने नोंदवलेल्या निरीक्षणांप्रमाणे आहे, ज्यामध्ये माननीय न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी, खंडपीठाच्या बाजूने पिडीतेच्या तिचे म्हणणे ऐकून घेण्याच्या अधिकाराविषयी आणि लॉ कमिशन ऑफ इंडिया यांनी त्यांच्या १५४ व्या अहवालामध्ये केलेल्या शिफारशी ज्या; “प्रत्येक फौजदारी कार्यवाही, ज्यात सात वर्षे किंवा

38□. अ क्रमांक १७१५० / २०२२
39( २०२२ ) ९ एस सी सी ३२१

सात वर्षांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा असलेले दोषारोप ठेवण्यात आले आहेत, त्यामध्ये पक्षकार म्हणून खटला चालविण्याचा त्याचा/ तिचा कायदेशीर प्रतिनिधी यांचा अधिकार" यास अधोरेखित करतात, यास अनुलक्षून खालीलप्रमाणे समर्पक निरीक्षणे नोंदविली आहेत.

१९. पुढे अशी शिफारस केली गेली होती की पीडित व्यक्तीस तिच्या/त्याच्या पसंतीच्या वकिला तर्फे बाजू मांडण्याचा अधिकार मिळावयास हवा आणि जर त्यास/तिस असा वकील नेमणे परवडणारे नसेल तर राज्याने, स्वखर्चाने वकिलाची सेवा पुरवावी. समितीने फौजदारी न्याय चौकशी मध्ये सहभाग घेण्याचा पीडित व्यक्तीचा हक्क, तिचा/त्याचा, तपासाबाबतची स्थिती समजून घेण्याचा आणि त्याबाबत आवश्यक ती पावले उचलण्याचा हक्क किंवा फौजदारी कार्यवाही दरम्यानच्या जामीन मंजूर करण्याच्या किंवा रद्द करण्याच्या टप्प्यासह प्रत्येक निर्णायक स्थितीमध्ये त्याला/तिला, त्याचे/तिचे म्हणणे मांडण्याचा हक्क या बाबी देखील मान्य केल्या होत्या. वरील विवेचनात संक्षिप्तपणे नोंद घेतलेल्या वेळोवेळी करण्यात आलेल्या शिफारशींच्या जोडीने न्यायिक हस्तक्षेपाची पुनरावृत्ती, यामुळे लोकसभेत फौजदारी प्रक्रिया संहिता (सुधारणा )कायदा २००८ पारित करावा लागला ज्यामुळे कलम २ ( डब्ल्यूए) अन्वये फक्त पीडित या संज्ञेच्या व्याख्येचा समावेशच केला नाही तर न्याय चौकशी दरम्यानच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर अशा पीडित व्यक्तींचे निरनिराळे हक्क वैधानिक रित्या मान्य देखील केले.

२०. येथे हे नमूद करणे समयोचित आहे की विधानमंडळाने "पीडित" या संज्ञेस विचारपूर्वक विस्तृत व स्पष्ट अर्थ प्रदान केला आहे ज्याचा अर्थ अशी व्यक्ती, जिला आरोपी व्यक्तीच्या एखाद्या कृतीच्या कारणास्तव नुकसान किंवा इजा पोहोचली असेल आणि त्यासाठी सदर आरोपीवर दोषारोप ठेवले असतील तसेच " पीडित "या संज्ञेच्या अर्थामध्ये त्याचा/तिचा पालक किंवा कायदेशीर वारसदार यांचाही समावेश होतो.

२५. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रस्तुत प्रकरणांमध्ये फौजदारी न्याय यंत्रणेस इतर कुणीही नव्हे तर अपीलकर्ती अभियोक्ती हीनेच चालना दिली आहे. ही तीच व्यक्ती होती जिने जेथे कथित गुन्हा घडला होता त्या हॉटेलचा स्वागतकक्षा मधून १०० नंबर डायल केला होता. तिच्या प्रकरणामध्ये तपासी अधिकाऱ्यांनी दाखविलेली उदासीनता आणि निष्क्रियता याबाबत तक्रार करण्यासाठी तिने पोलिसांच्या अधिकारश्रेणीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला होता. विशेषतः उत्तरवादी क्रमांक २/आरोपी याने विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्यासमोर केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जामध्ये तिने हस्तक्षेप अर्ज दाखल केला होता आणि पारित झालेल्या आदेशामध्ये प्रतीत झाल्यानुसार तिच्या वकीलास सुनावणीची संधी देण्यात आली होती व त्यानंतर सदर अर्ज फेटाळण्यात आला होता. परंतु उत्तर वादी क्रमांक २/ आरोपी याने दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जामध्ये जेव्हा अपील करती फिर्यादी हिने तशाच प्रकारचा हस्तक्षेप अर्ज[40] उच्च न्यायालयासमोर दाखल केला तेव्हा जरी तिच्या वकिलाची उपस्थिती आदेशामध्ये

40 □. अ क्रमांक १७१५० / २०२२

नमूद केलेली नव्हती तरी तिने केलेल्या विनंतीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. आम्हास हे नमूद करणे भाग आहे की असा दृष्टिकोन फिर्यादीच्या फौजदारी खटल्यामध्ये सहभागी होण्याच्या हक्कास मान्यता देण्यास अपयशी ठरतो ज्यामध्ये आरोपीने दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जास विरोध करण्याचा हक्क समाविष्ट आहे. जेव्हा अटकपूर्व जामीनाचा उत्तरवादी क्रमांक २/आरोपीच्या लाभात देण्यात आलेला पहिला आक्षेपित आदेश दुसऱ्या आक्षेपित आदेशाद्वारे कायम करण्यात आला तेव्हा अपीलकर्ती / अभियोक्ती हिस अर्थपूर्ण सुनावणी नाकारण्यात आल्याने आक्षेपीत आदेशांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी या न्यायालयास अतिरिक्त हक्क प्राधान्याने प्राप्त झाला आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

२६. वर नमूद केलेल्या कारणास्तव उत्तरवादी क्रमांक दोन आरोपी यास अटकपूर्व जामीन मंजूर करणारे दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ आणि ७ ऑक्टोबर, २०२२ रोजीचे आक्षेपीत आदेश टिकण्याजोगे नाहीत आणि ते रद्दबातल ठरविण्यात येत आहेत. उत्तरवादी क्रमांक २/आरोपीची जमानतपत्रे / जातमुचलके रद्द करण्यात येत आहेत.

२७. परंतु या न्यायालयाने प्रकरणाच्या गुणवत्तेवर काहीही भाष्य केलेले नाही हे आम्ही त्वरेने नमूद करतो. या प्रकरणात दोषारोप या आधीच दाखल करण्यात आले आहे. जर उत्तर वादी क्रमांक दोन आरोपी याने योग्य त्या न्यायालयासमोर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३९ नुसार अर्ज

दाखल केला तर तो वर नोंदविलेल्या निरीक्षणांच्या प्रभावाखाली न येता त्या अर्जाच्या स्वतंत्र गुणवत्तेवर आणि कायद्याच्या तरतुदीनुसार विचारात घेतला जाईल.

२८. वरील अटीनुसार सदर अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

प्रबंधकांना देण्यात आलेले निर्देश :-

२९. या प्रकरणातील आरोपांची संवेदनशीलता आणि तक्रार करण्यात आलेल्या गुन्ह्याचे स्वरूप लक्षात घेता अपील करती अभियोक्ती  हिच्या ओळखीस  संरक्षण देणे क्रमप्राप्त आहे या प्रकरणांमध्ये तिला श्रीमती क्ष असे संबोधण्यात आले आहे प्रस्तुत प्रकरणात प्रबंधकांना निर्देश देण्यात येत आहेत की, अभिलेखांमधून अपीलकर्ती / अभियोक्ती हिच्या नावात सुधारणा करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. यापुढे, प्रस्तुत प्रकरणासारख्या संवेदनशील प्रकरणांमध्ये जर फिर्यादीचे नाव याचिकेमध्ये उघड झाल्यास योग्य त्या आदेशा करिता न्यायालयासमोर प्रकरण सादर करण्यापूर्वी ते नावात सुधारणा करण्यासाठी ते संबंधित विद्वान वकिलांकडे परत पाठविल्याची प्रबंधकांनी खातरजमा करावी.

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक

आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

\- - - - - - - - - - - - -